Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## :: परिपत्रक ::

विषय : Research & Publication Ethics परीक्षेच्या आयोजनासंदर्भात......

संदर्भ : जा. क्र. शिवाजीवि/पीजीबीयुटीआर/७७३ दि. ०२.०३.२०२३.

उपरोक्त संदर्भानुसार पीजीबीयुटीआर विभागाकडून कळविण्यात आले आहे की, ज्या अधिविभागांनी आरपीई कोर्सवर्कसंदर्भात कार्यवाही पूर्ण केली आहे, त्यांनी विद्यार्थीनिहाय माहिती पीजीबीयुटीआर विभागास दि. ०९.०३.२०२३ पूर्वी कळविण्यात यावी व त्याची एक प्रत विद्यार्थ्यांच्या माहितीसह परीक्षा विभागास देण्यात यावी. या अनुषंगाने संबंधित अधिविभागांनी कार्यवाही सुरू केली असून अधिविभागाकडून परीक्षा विभागाकडे माहितीस्तव परीक्षेकरिता प्रविष्ठ विद्यार्थ्यांची यादी, गुण प्राप्त होत आहेत.

तथापि, Research & Publication Ethics या परीक्षेकरिता प्रविष्ठ विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी, सैध्दांतिक परीक्षेचे गुण व अंतर्गत परीक्षेचे गुण ऑनलाईन पध्दतीने प्रणालीमध्ये भरणे, इत्यादी मुद्दे अवलोकनी घेऊन संबंधित महाविद्यालये/अधिविभाग यांनी कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने संगणक केंद्राकडून अनुषंगिक संगणक प्रणाली विकसनाची कार्यवाही सुरु असून संगणक केंद्राकडून मार्गदर्शन घेऊन महाविद्यालये/अधिविभाग यांनी उचितरित्या पुढील कृती करावी.

Research & Publication Ethics या परीक्षेकरिता प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण प्रणालीमध्ये भरून, सदरचे गुण प्रणालीमध्ये Confirm करून संबंधित गुणांची हार्डकॉपी अधिविभागप्रमुख/ प्राचार्य/ समन्वयक/ संचालक यांच्या स्वाक्षरीने परीक्षा विभागाकडे सादर करावेत. हस्तपध्दतीने तयार करण्यात आलेले अंतर्गत परीक्षेचे गुण परीक्षा विभागाकडे सादर करु नयेत, त्यावर कोणतीही कार्यवाही करता येत नाही.

उपरोक्त मुद्दे अवलोकनी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

डॉ. ए. एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/८९
दि. ०९.०३.२०२३

प्रति,

१. संगणक केंद्र, उपरोक्त नमूद केल्यानुसार कार्यवाहीस्तव, तसेच आवश्यक संगणकीकृत अहवाल प्रणालीमध्ये उपलब्ध होणेकामी संगणक प्रणाली विकसित करण्याकरिता.
२. मा अधिविभागप्रमुख/प्राचार्य/संचालक/समन्वयक,
विद्यापीठ अधिविभाग/सर्व संलग्नित संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संशोधन संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या उचित कार्यवाहीस्तव.
३. इंटरनेट सेल : सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Home Page आणि Exam Circular या संकेतपत्त्यावर प्रकाशित करावे.